**श्री. किशोर पांडुरंग साळवे, तहसिलदार, राज्य निवडणूक आयोग, यांची राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ या कार्यालयातील कक्ष अधिकारी या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती बाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन आदेश क्र. साप्रवि-१२०२२/३५/२०२६-साप्रवि / माहिती (कक्ष-६)**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक- ०७ सप्टेंबर, २०२६

**संदर्भ** :- १. सा.प्र.वि. शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०११/प्र.क्र.१३७/कार्यासन १२, दि. १७-१२-२०१६.

२. सा.प्र.वि. शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.५१०/कार्या.१२, दि. १६-०२-२०१८

३. शासन पुरकपत्र क्र.साप्रवि-१२०२२/१५/२०२५, कार्या-६, दि: ३१ जुलै, २०२५

४. शासन पत्र क्र.साप्रवि-१२०२२/१५/२०२५, कार्या-६, दि:०२.०४.२०२६ व दि :१२.०६.२०२६

५. महसुल व वन विभागाचे पत्र क्र. डिपीटी-२०२६/प्र.क्र.१८२/आस्था-३ (ई.नं.१६९६५८५)

दि १२.०८.२०२६

**शासन आदेश :-**

संदर्भाधिन क्र.१ येथील दिनांक १७-१२-२०१६ च्या शासन निर्णयान्वये प्रतिनियुक्तीचे धोरण निश्चित करण्यात आले असून, संदर्भाधिन क्र. २ येथील दि. १६-०२-२०१८ च्या शासन निर्णयान्वये सदर धोरणामध्ये सुधारणा करण्यात आली आहे. संदर्भ क्र.४ येथील पत्रान्वये राज्य माहिती आयोगातील रिक्त पदे प्रतिनियुक्तीने भरण्याकरीता शासनाच्या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन अधिकारी / कर्मचारी यांच्याकडून इच्छुकता मागविण्यात आली होती. त्यानुषंगाने संदर्भ क्र.५ येथील पत्रान्वये श्री. किशोर पांडुरंग साळवे, तहसिलदार, राज्य निवडणूक आयोग, यांचा राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ या कार्यालयातील कक्ष अधिकारी या पदावर या प्रतिनियुक्तीने नियुक्ती मिळणेबाबतचा अर्ज ना-हरकत प्रमाणपत्रासह या विभागास प्राप्त झाला आहे.

२. श्री. किशोर पांडुरंग साळवे, तहसिलदार, राज्य निवडणूक आयोग, यांची राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ या कार्यालयातील कक्ष अधिकारी या पदावर खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून ३ वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात येत आहे.

अ ) श्री. साळवे हे ज्या तारखेला प्रतिनियुक्तीच्या पदावर रूजू होतील त्या तारखेपासून प्रतिनियुक्तीच्या सेवेचा प्रारंभ होईल आणि ती सेवा ज्या तारखेला ते आपल्या शासकीय पदाचा कार्यभार पुन्हा स्वीकारतील त्या तारखेला समाप्त होईल.

(ब) जर त्यांची सेवा लोकसेवेच्या हिताच्या दृष्टीने शासनाला आवश्यक वाटली तर प्रतिनियुक्तीचा कालावधी संपण्यापूर्वी कोणत्याही वेळी त्यांना परत बोलावून घेण्याचा अधिकार शासन / सक्षम प्राधिकाऱ्यास राहील.

(क) जर त्यांची सेवा स्वीयेत्तर नियोक्त्याला आवश्यक वाटली नाही, तर त्यांना मूळ विभागाकडे परत पाठविण्याची मुभा स्वीयेत्तर नियोक्त्याला राहील. मात्र याप्रमाणे परत पाठविण्यापूर्वी स्वीयेत्तर नियोक्त्याने शासनाला / सक्षम प्राधिकाऱ्याला तीन महिन्यांची नोटीस दिली पाहिजे.

(ड) श्री. साळवे हे आदेशात विहीत केलेला प्रतिनियुक्तीचा कालावधी पूर्ण होण्यापूर्वीच स्वतःहून मूळ प्रशासकीय विभागात/कार्यालयात परत जाण्यास इच्छुक असल्यास त्यांनी समर्थनीय कारण स्पष्ट करुन त्यासाठी किमान तीन महिन्यांची पूर्वसूचना (नोटीस) दोन्ही प्रशासकीय विभागास/कार्यालयास देणे आवश्यक राहील.

३. श्री. साळवे यांच्या इतर सर्व प्रशासकीय बाबी महसुल व वन विभागामार्फत हाताळण्यात येतील.

४. सचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी श्री. साळवे यांना तात्काळ कार्यमुक्त करावे.

५. श्री. साळवे यांनी राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ येथील कक्ष अधिकारी या पदावर तात्काळ हजर होऊन त्या पदाचा कार्यभार स्वीकारल्याबाबत या विभागास अवगत करावे.

६. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०९०७१७१६२२५१०७ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करून काढण्यात आले आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

BHARATI DINESH DHURI

Digitally signed by BHARATI DINESH DHURI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD IT, 2.5.4.20=AC65E55BC2F86EC37C6F25108B6605BC20E71B4742DD20D7E8F5E14CDA6A2A7F, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=6B3C122EDC26AC3532130D69CD06C9664E8A139B9A532752E240A4851A8C9D3C, cn=BHARATI DINESH DHURI
Date: 2026.09.07 17:17:50 +05'30'

**( भारती दि. धुरी )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत:-**

१. सचिव, राज्य माहिती आयोग,मुख्यालय मुंबई.
२. सचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३. उप सचिव, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ.
४. उप सचिव (आस्था-३) महसुल व वन विभाग़ मंत्रालय मुंबई.
५. जिल्हा कोषागार अधिकारी, अमरावती.
६. श्री.किशोर साळवे, तहसिलदार, राज्य निवडणूक आयोग,मुंबई.
७. कार्यासन-६ संग्रहार्थ